# समिती दर्पण

**एप्रिल २०२५**

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


## समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये एक अशी आठ वसतिगृहे आहेत. त्यात सुमारे ११०० विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# समाजाच्या मदतीतून समाजाचे काम

**चंद्रकांत कुलकर्णी,**
**मुख्य विकास अधिकारी**

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाला या वर्षी ७० वर्षे पूर्ण होत आहेत. एखादे स्वप्न पाहणे, ते प्रत्यक्षात येण्यासाठी धडपडणे आणि त्या स्वप्नपूर्तीचा आनंद घेणे, हे संस्थापक डॉ. अच्युतराव आपटे यांच्यापासून आजच्या समिती परिवारातील प्रत्येक घटकाने अनुभवले आहे आणि अनुभवत आहेत. ग्रामीण भागातील गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना पुण्यात उच्च शिक्षण घेताना त्यांना परवडणाऱ्या दरात निवास- भोजनाची व्यवस्था उपलब्ध करून देणे आणि काळानुरूप त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रयत्न करणे, असे स्वप्न घेऊन पाच विद्यार्थ्यांची वाराने जेवणाची सोय करण्यापासून हे काम सुरू झाले. सध्या पुण्यात मध्यवर्ती ठिकाणी सात वसतिगृहांची व्यवस्था असून सुमारे ११५० विद्यार्थ्यांना येथील सुविधांचा लाभ मिळत आहे.

जुलै २०१९ मध्ये पुण्याबाहेर प्रथमच अहिल्यानगर येथे एक जागा भाडेतत्वावर घेऊन ३० - ३२ विद्यार्थ्यांची व्यवस्था केली. दीड- दोन वर्षे हा प्रयोग यशस्वीपणे राबवला. नंतर कोरोनामुळे हा प्रयोग थांबवावा लागला. परंतु या आत्मविश्वासातून नगरमध्ये जागा खरेदी करून वसतिगृह सुरू करावे, असा विचार पुढे आला. योगायोग असा की, दोन चांगल्या जागा मिळाल्या. सावेडीतील जागेत परिमल व प्रमोद चौधरी फाउंडेशनने केलेल्या संपूर्ण आर्थिक मदतीतून ६० मुलींसाठी मधुभाऊ चौधरी वसतिगृह सुरू झाले.

कल्याण रोड- नालेगाव परिसरात मुलांसाठी वसतिगृह उभारण्याचा विचार सुरू केला. चांगल्या कामाला पैसे कमी पडत नाहीत, अशी आम्हाला संस्थापकांची शिकवण आहे. गुरुवर्य तांबोळी सरांच्या प्रेरणेतून निधिसंकलन संकल्प केला, तेव्हा दुबईतील प्रसिद्ध उद्योजक विनोद जाधव समितीशी जोडले. त्यांनी या कार्याला मोठे योगदान देण्याची तयारी दर्शविली. शालेय जीवनात काही काळ ते वसतिगृहात राहिल्याने तो अनुभव त्यांच्या पाठीशी होता. वसतिगृहातून जे जीवनशिक्षण मिळते, ते पुढील आयुष्याला आकार देण्यासाठी मोलाचे असते, अशी त्यांची धारणा आहे. त्यांच्या वडिलांनी (कल्याणराव जाधव) शिक्षणासाठी अनेकांना



वसतीगृहाचे भूमिपूजन करताना विनोद जाधव.



सहकार्य केले. गरजूंना योग्य मार्गदर्शन, प्रसंगी आर्थिक मदतही केली. त्यांचा हा वारसा पुढे चालवा, वडिलांचे स्मारक म्हणून विनोद सरांनी व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुवर्णा यांनी या वसतिगृहाला आर्थिक मदत करण्याचे ठरवले.

कल्याणराव जाधव यांच्या नावे हे वसतिगृह आकाराला येत आहे. येत्या जुलैपासून येथे ग्रामीण विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहेत. १२० विद्यार्थ्यांची येथे निवास, भोजनाची व्यवस्था होणार आहे. समितीचे माजी विद्यार्थी आणि विनोद सरांचे मित्र विजय कदम यांनी या वसतिगृहातील एका खोलीसाठी १० लाख रुपयांची देणगी जाहीर केली आहे. या वसतिगृहाला साधारण १२ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यातील जवळपास निम्म्या खर्चाचा भार विनोद जाधव यांनी उचलला आहे. उर्वरित मदतीसाठी दानशूर व्यक्तींना आवाहन करण्यात येत आहे.

### नगर जिल्ह्यातील माजी विद्यार्थ्यांना आवाहन

समितीच्या इतिहासात पहिल्यांदाच पुण्याबाहेर अहिल्यानगर येथे दोन वसतिगृहे होत आहेत. आपल्या भागातील गरजू आणि होतकरू तरुण-तरुणींना उच्च शिक्षण घेण्यासाठी अहिल्यानगर येथे यायचे असेल, तर आपण अवश्य समितीचा संदर्भ द्यावा. या दोन्ही वसतिगृहासाठी कार्यकर्ते म्हणून वेळ द्यावा. तसेच या वास्तूंतील विविध सुविधांच्या देणग्यांसाठी आपापल्या भागातील दानशूरांना आवाहन करावे.

| | |
|---|---|
| वसतिगृहातील एकूण खोल्या **४०** | १८३ चौ. फु. खोलीत विद्यार्थी **३** |

### विविध सुविधांसाठी अपेक्षित देणगी

| | |
|---|---|
| प्रत्येक खोलीसाठी **१० लाख** | ४० केव्हीए सोलर पॉवर **२५ लाख** |
| कॉन्फरन्स हॉल **३० लाख** | भोजनकक्ष **४० लाख** |
| ग्रंथालयासाठी **३० लाख** | आरोग्य केंद्रासाठी **२० लाख** |

**संपूर्ण मजल्यासाठी १.७५कोटी**

वरील सुविधांसाठी देणगी देऊन आपल्या इच्छेनुसार नामफलक लावण्याची सुविधा दानशूरांसाठी उपलब्ध असणार आहे. समाजाच्या मदतीतून समाजासाठी काम, अशा धारणेतून हा प्रकल्प साकारला जात आहे. या वसतिगृहात बदलत्या काळाच्या गरजा लक्षात घेऊन संगणक सुविधा, क्रमिक पुस्तकांबरोबर अवांतर पुस्तके, व्हिडिओ कॉन्फरन्स अशा अत्याधुनिक सुविधा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असतील.

## श्रद्धांजली



समितीचे कार्यकर्ते, विद्यार्थी विकास केंद्र या संकल्पनेचे जनक प्रकाश अकोलकर यांचे ११ एप्रिल रोजी निधन झाले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी सतत प्रयत्नशील असणारे अकोलकरसर यांना माजी विद्यार्थ्यांनी वाहिलेली शब्दसुमनांजली...

## विद्यार्थी विकास संकल्पनेचे जनक

**तुकाराम गायकवाड**



विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कार्यात विद्यार्थी विकास केंद्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या केंद्रामार्फत समितीतील विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व विकासाचे अनेकविध उपक्रम वर्षभर राबवले जातात. त्यामुळे समितीच्या विद्यार्थ्यांची सर्वांगिण जडणघडण होऊन समाजात त्याचे वेगळेपण ठळकपणे जाणवते. समितीमध्ये विद्यार्थी विकास केंद्र ही संकल्पना प्रकाश अकोलकर यांच्या पुढाकाराने आकारास आली. अगदी तरुण वयात अकोलकरसर समितीच्या कामात सहभागी झाले. त्याआधी त्यांनी चिन्मय मिशनच्या कार्यात सहभाग घेतला होता. डॉ. अच्युतराव आपटेसरांशी त्यांची वेळोवेळी चर्चा होत असे. या चर्चांमधून अकोलकरसरांनी जेवण व निवास व्यवस्थेशिवाय विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास ही संकल्पना मांडली. अच्युतरावांनी त्यांच्या स्वभावाप्रमाणे अकोलकरसरांना सविस्तर टिपण करून प्रस्ताव तयार करण्यास सांगितले व समितीच्या इतर कार्यकर्त्यांबरोबर चर्चा करून समितीच्या ध्येय- धोरणामध्ये विद्यार्थी विकास ही संकल्पना अंगिकारली. त्यांच्यातील अभ्यासू वृत्तीचा अच्युतरावांना प्रत्यय आल्याने अगदी तरुण वयातच अकोलकरसर समितीच्या विश्वस्त मंडळावर कार्यकर्त्यांचे प्रतिनिधी म्हणून निवडले गेले व पुढे जवळपास २० वर्षांहून अधिक काळ समितीच्या कार्यकर्ता मंडळाची धुरा त्यांनी अध्यक्ष म्हणून सांभाळली. समितीच्या कार्याला दिशा देण्यासाठी वेळोवेळी अनेकविध प्रस्ताव तयार करून, समितीच्या कार्यकर्त्यांच्या सहामाही व वार्षिक बैठकीत मांडणे, त्यावर सर्वांगिण चर्चा घडवून आणणे, चर्चेतून झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी झाली आहे अथवा नाही, याचा काटेकोरपणे पाठपुरावा करणे, अशा अनेक गोष्टींमधून अकोलकरसरांनी समितीच्या कार्याला चांगले वळण लावले.

स्वतःचा 'Arbitrator' हा पेशा सांभाळून अकोलकरसर विद्यार्थी विकास केंद्राच्या अनेक उपक्रमांमध्ये सहभागी होत. पुढे स्वतःची मुले कर्तृत्ववान झाल्यावर सरांनी त्यांच्या पत्नी उषाताई यांनाही विद्यार्थी विकास केंद्राच्या उपक्रमामध्ये सहभागी करून घेतले.

जवळपास ५० वर्षांहून अधिक काळ अकोलकरसरांनी समितीच्या कार्यात सहभाग घेतला. माजी विद्यार्थ्यांनी समितीच्या कार्यात सहभागी व्हावे व समितीच्या कार्याची धुरा सांभाळावी, अशी त्यांची इतर कार्यकर्त्यांप्रमाणे मनापासूनची इच्छा होती. त्यांच्या प्रयत्नातूनच माझ्यासारखे अनेक माजी विद्यार्थी समितीच्या कार्यात रुजू झाले. त्यांच्या वृद्धापकाळात समितीचा विद्यार्थी विठ्ठल शेळके याने कमवा व शिका योजनेअंतर्गत त्यांची सेवा केली. अत्यंत तृप्त मनाने सरांनी ११ एप्रिल २०२५ रोजी त्यांच्या बंगळूरस्थित मुलीच्या घरी इहलोकीचा निरोप घेतला. त्यांनी सुरू केलेल्या विद्यार्थी विकास केंद्र या संकल्पनेचा विस्तार करणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

## सर्वांगिण विकासाचे प्रेरणास्त्रोत

**तुषार रंजनकर**



प्रकाश अकोलकरसर गेल्याची बातमी समजली आणि मन त्यांच्या आठवणींत ३०-३५ वर्षे मागे समितीच्या दिवसांत गेले. बहुतांश वेळा सर संध्याकाळी समितीत येत. आम्ही विद्यार्थी असताना विविध विषय घेऊन गटचर्चेच्या माध्यमातून चर्चा घडवून आणत. विषय निवडणे, त्याची सर्व बाजूंनी मांडणी, त्यावर मतप्रदर्शन अशा गोष्टींतून आम्हाला खूप शिकायला मिळाले.

शिक्षण संपवून बाहेर पडल्यावर काही काळ स्थिरस्थावर होण्यात गेला. नंतर माजी विद्यार्थी म्हणून समितीत यायला सुरुवात केली. त्याचा सरांना खूप आनंद वाटला. माजी विद्यार्थ्यांनी समितीच्या कार्याची धुरा घेतली पाहिजे, ही संस्थापक अच्युतराव आपटेसरांची जशी इच्छा होती, तसे अकोलकरसरही त्यासाठी आग्रही होते. त्यांना माजी विद्यार्थ्यांविषयी अत्यंत आपुलकी होती. सर नेहमी आपुलकीने चौकशी करायचे.

मी हळूहळू विद्यार्थी विकास केंद्राचे काम पाहायला सुरुवात केली. या केंद्राची संकल्पना आणि मांडणी अकोलकरसरांनी केली होती. या केंद्रांतर्गत मी विविध क्लबची सुरुवात केली. ही कल्पना त्यांना आवडली. यात प्रामुख्याने सायन्स, इंजिनिअरिंग, स्पोर्ट्स असे क्लब होते. या क्लबला विद्यार्थ्यांचा असलेला प्रतिसाद पाहून अकोलकरसरांना खूप आनंद वाटे. सरांची मत मांडण्याची पद्धत फार सुंदर होती. समितीचे विश्वस्त आणि अनेक वर्षे कार्यकर्ता मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी पाहिली. बैठक कशी घ्यावी, वेळेचे नियोजन कसे सांभाळावे, विषयांचा अभ्यास आणि मत मांडतानाही ते ठाम आणि निर्धारपूर्वक कसे असावे, अशा अनेक गोष्टी आम्हाला अनुभवता आल्या. कार्यकर्ता म्हणून जबाबदारी स्वीकारताना मला या गोष्टींचा मोठा फायदा झाला.

विठ्ठल हा समितीचा माजी विद्यार्थी सोबत म्हणून सरांकडे राहत होता. सरांच्या घरी जाऊन त्यांच्याशी गप्पा मारण्यात खूप समाधान वाटे. आम्ही माजी विद्यार्थी कुटुंबासह सरांकडे जात असू. समितीच्या विद्यार्थी विकास केंद्राच्या उपक्रमांवर त्यांनी एक पुस्तक लिहिले आणि त्याच्या विनामूल्य प्रती माजी आणि आजी विद्यार्थ्यांना दिल्या. विद्यार्थी विकास या संकल्पनेचे ते जनक होते. ज्या योजनेमुळे हजारो तरुणांना व्यक्तिमत्त्व विकास म्हणजे काय, याची जाणीव झाली. सरांकडून अनेक गोष्टी शिकता आल्या. ज्याचा उपयोग समितीचे काम पुढे नेण्यासाठी होणार आहे.

# सकारात्मकतेमुळे गवसली यशाची वाट

तयाचा वेलू...

**शंकर तागड,** माजी विद्यार्थी-कॅनडा

सकारात्मक वृत्ती माणसाला कुठे घेऊन जाऊ शकते, ह्याचे उदाहरण आहेत, सध्या टोरांटो, कॅनडावासी श्री. शंकर तागड.

वडील फारसे शिकलेले नाहीत. आई तर निरक्षरच. घरची आर्थिक परिस्थिती बिकट. अशी पार्श्वभूमी असलेल्या, उंडेगाव (ता. परांडा, जि. धाराशिव) येथील ह्या मुलाने, त्या सकारात्मक वृत्तीच्या बळावर, आतापर्यंत अमेरिका, आशिया, युरोप खंडातल्या अनेक देशांना कामानिमित्त भेट दिली आहे आणि आता टोरांटोमध्ये स्थायिक झाला आहे.

शंकरचे आईवडील कमी शिकलेले असले, तरी आईच्या माहेरी शिक्षणाची चांगली पार्श्वभूमी होती आणि त्यांच्या आजोबांना (वडिलांचे वडील) शिक्षणाची कळकळ होती. ते सरपंच आणि स्वतः अतिशय उद्यमशील, गावात किराणा दुकान, गुऱ्हाळ, गिरणी असे अनेक व्यवसाय ते चालवित. आई आणि आजोबा यांचा शंकर यांच्या शिक्षणाला भक्कम पाठिंबा होता.

समितीचे माजी विद्यार्थी चंद्रकांत कुलकर्णी ह्याच गावचे. त्यांच्यामुळेच आजोबांनी शंकर यांना पुण्याला पाठविले. त्यापूर्वी शंकर यांचे प्राथमिक शिक्षण गावात जिल्हा परिषद शाळेत झाले. पहिली ते चौथीचा एकच वर्ग आणि दोन शिक्षक. चौथीच्या पुढचे शिक्षण घरापासून पाच किलोमीटरवर असलेल्या जय हनुमान विद्यालय, वाटेफळ येथे झाले. दहावीत चांगले गुण मिळाल्याने त्यांना पुण्यात कॉलेजमध्ये अॅडमिशन लगेचच मिळाली आणि समितीमध्ये सुद्धा.

अकरावी- बारावी ही दोनच वर्ष ते समितीमध्ये राहिले, पण हा त्यांच्या आयुष्यातला पहिला महत्त्वाचा stepping stone होता. समिती नसती तर पुण्यात राहणे परवडण्यासारखेच नव्हते आणि मग पुढचे रस्ते आपोआप बंद झाले असते, असे ते कृतज्ञतेने सांगतात.

समितीच्या बाबतीत अजून दोन महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख त्यांनी केला, पहिली, इथे जातीभेद नाही. दुसरे म्हणजे आधार दोन प्रकारचा लागतो. एक पैशाचा आणि दुसरा मार्गदर्शनाचा... समिती दोन्ही आधार देते.

पुण्यातले सुरुवातीचे दिवस अवघड होते. त्याविषयी ते म्हणाले, "एक स्लीपर आणि दोन जोड कपडे घेऊन पुण्यात आलो होतो. समितीने राहायला जागा दिली, दोन वेळचे जेवण दिले. त्या जेवणाचे पैसे आपले आपण कमवता येण्यासाठी 'कमवा-शिका'सारखी योजना दिली. जगात जगावे कसे, याचे शिक्षण विद्यार्थी विकास केंद्राने दिले. ज्या गोष्टी आम्हाला कधी माहितीच झाल्या नसत्या, त्यांची ओळख करून दिली. अनेक मित्र दिले."

ते म्हणतात, 'Nothing comes easy to anybody. Life is full of challenges but never hold back. when you help people, it comes back to you in some form some day. This is how things are, just accept and go ahead...' आणि त्यांच्या गोष्टीतून हे कळून येते की, हे नुसते सांगत नाहीयेत, हे quotes त्यांच्यात मुरलेले आहेत.

शंकर यांना थायलंडमध्ये Master in Food Science ह्या कोर्ससाठी Asian Institute of Technology या प्रथितयश संस्थेत २०,००० US dollars च्या स्कॉलरशिपसकट प्रवेश मिळाला. पण तरी आणखी पैसे लागणार होते. त्यांनी कर्जासाठी बँकेत प्रस्ताव दिला. शेती तारण ठेवावी लागणार होती. एक कुटुंबात काहींनी विरोध केला. पण ते म्हणाले, "मला



खात्री होती, की मी चांगलं काम, पगार मिळवू शकेन. जे लोन मीच फेडणार आहे, ते घेण्यासाठी मी कशाला कोणाची परवानगी घ्यावी?" आणि तसे त्यांनी करून दाखवले.

एमबीबीएस करावे, असे त्यांच्या मनात होते, पण प्रवेश मिळाला नाही. B.tech (agri) करून एमपीएससी करण्यासाठी त्यांनी राहुरीच्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. कॉलेजमध्ये त्यांचे प्राध्यापक चेतन नेमाडे यांनी सांगितले, की तू फूड सायन्सेसमध्ये पोस्टग्रॅज्युएशन कर. शंकर यांनी तो सल्ला मानला आणि AIT मध्ये प्रवेश घेतला. तसेच पॅरिस येथील HEC ह्या संस्थेतून त्यांनी social enterpreneurship ह्या विषयात एक certificate course पण केला.

तिथून त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. आधी एक स्टार्टअप, मग TCS सारख्या प्रथितयश कंपनीसाठी भारतात कृषी क्षेत्रात नोकरी केली. त्यांना परदेशी स्थायिक व्हायचे होते म्हणून त्यांनी विचारपूर्वक कॅनडाची निवड केली. TCS ने कॅनडामध्ये जे प्रोजेक्ट देऊ केले ते cyber security/ banking sector मधील होते. त्यांचा तोपर्यंत या क्षेत्राशी काहीही संबंध आलेला नव्हता. तरीही न घाबरता त्यांनी आव्हान स्वीकारले. LinkedIn वर आणि इतरही अनेक कोर्स केले. सध्या ते तिथल्या सर्वांत मोठ्या बँकेसाठी २० लोकांच्या टीमचे लीडर म्हणून कार्यरत आहेत. अजून एक कळीची गोष्ट त्यांनी सांगितली. 'To work in software sector, you need not have formal education. What you need is a right attitude and a skill set to get the things done!!!'

स्थिरस्थावर झाल्यावर आता ते समितीसाठी काम करू लागले आहेत. समितीच्या कार्याचा कॅनडामध्ये प्रसार व्हावा यासाठी प्रयत्न करत आहेत. तिथून त्यांनी समितीसाठी काही देणग्या, काही मेंटॉर मिळवण्याची, काही मुलांना कमवा- शिका योजनेखाली कामे मिळवून देण्याची जबाबदारी घेतली आहे.

सायकलिंग, ट्रेकिंग आणि कुकिंग हे त्यांचे छंद आहेत.

"मला प्रत्येक पायरीवर चांगले लोक भेटत गेले. मदत मिळत राहिली, लोकांनी माझ्यावर विश्वास टाकला, मला संधी देत राहिले, त्याबद्दल मी अतिशय कृतज्ञ आहे. माझे आजोबा, प्रा. चेतन नेमाडे, डॉ. विलास साळोखे (AIT मधील प्राध्यापक), चंद्रकांत कुलकर्णी यांचा मी ऋणी आहे!" त्याचे हे म्हणणं त्यांच्या प्रवृत्तीला धरूनच आहे.

दोन गोष्टींविषयी त्यांना खंत आहे, आईवडिलांना कॅनडा दाखवायला आणायचे आहे पण ते जमणे अवघड वाटत आहे. आणि दुसरी कदाचित आपल्या सगळ्यांच्या डोळ्यात अंजन घालणारी... In silicon valley a failure is a case study, but in our country mostly it is... the end.

आपल्या उच्चशिक्षित पत्नी सौ. अस्मिता यांचा शंकर यांना खूप अभिमान आहे. त्या भारतात सीए झाल्या आणि कॅनडामध्ये जाऊन त्यांनी सीपीए पूर्ण केले. त्यांचा मुलगा आयुष अडीच वर्षांचा आहे. त्याच्यासंबंधी ते गमतीने म्हणाले, पुण्यात आल्यावर मी इंग्रजी शिकण्यासाठी, बोलण्यासाठी धडपडलो... आता आयुष इंग्रजी बोलतो. त्याला मराठी शिकवण्यासाठी धडपडतो आहे...

समिती वृत्त

## माजी विद्यार्थिनी संपदाचे यूपीएससी परीक्षेत यश



समितीची माजी विद्यार्थिनी संपदा धर्मराज वांगे हिने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेत देशपातळीवर ८३९ रँक मिळविला आहे.

संपदा ही मूळची लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील नारवटवाडी येथील. तिचे प्राथमिक शिक्षण गावापासून तीन किलोमीटरवरील पानगाव येथील जि. प. शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण पानगावच्या सरस्वती विद्यालयात व लातूरच्या गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालयात झाले. लातूरच्या शाहू कॉलेजामध्ये अकरावी, बारावी तर पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात बीएपर्यंतचे शिक्षण घेतले. संपदा हिचे वडील शेतकरी, तर आई निर्मला प्राथमिक शिक्षिका आहे. शेतकरी आजोबा श्री हरिचंद्र हरिदास यांची इच्छा आणि प्रेरणा, प्राथमिक शिक्षक असलेला भाऊ श्रीधर यांचे मार्गदर्शन, स्वतःची इच्छा, जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर तिने हे यश मिळविले. पदवीचे शिक्षण घेत असताना २०१७ ते २०१९ या दरम्यान संपदा समितीच्या सुमित्रा सदनमध्ये वास्तव्यास होती.



*कर्नल श्रीकृष्ण एडके यांनी त्यांच्या पत्नी अनिता यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पुण्यातील मुलींच्या नवीन वसतिगृहातील एका खोलीसाठी रुपये १० लाखांची देणगी दिली. या खोलीचे उद्घाटन श्री. एडके आणि त्यांच्या कन्या स्मिता लेले यांच्या उपस्थितीत करण्यात आले.*

## जर्मन भाषा अभ्यासक्रमात ४३ विद्यार्थ्यांचा सहभाग

समितीच्या विद्यार्थी विकास केंद्राच्या वतीने, fahrspielern अकादमी या प्रशिक्षण संस्थेच्या सहकार्याने जर्मन भाषा प्रमाणपत्र (A-1) अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पाच वसतिगृहांतील ४३ विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमात सहभाग घेतला. नक्षत्रीन फाउंडेशनने हा उपक्रम प्रायोजित केला होता.

हा कोर्स ४ डिसेंबर २०२४ ते ७ मार्च २०२५ या दरम्यान पार पडला. सौ. रचना वालवडे आणि कु. ऋचा वालवडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एकूण ३६ सत्रे घेण्यात आली. त्यापैकी २१ सत्रे ऑफलाइन आणि १५ सत्रे ऑनलाईन/ हायब्रिड पद्धतीने झाली. अंतिम परीक्षा २४ मार्च २०२५ रोजी झाली. या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांकडून ५०० रुपये इतके नाममात्र शुल्क घेण्यात आले होते.

अंतिम परीक्षा जर्मनीतील आंतरराष्ट्रीय सल्लागार श्री. प्लापुट्टा यांच्या देखरेखीखाली ऑनलाईन घेतली गेली. एकूण १९ विद्यार्थ्यांनी या परीक्षेला हजेरी लावली. १७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कोर्सच्या यशस्वी सांगतेनिमित्त 'जर्मन डे सेलिब्रेशन'चे आयोजन समितीच्या मुलींच्या नवीन वसतिगृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमात सांस्कृतिक कार्यक्रम, भाषिक उपक्रम व विद्यार्थ्यांच्या जर्मन भाषेतील प्रगतीचे सुंदर दर्शन घडवण्यात आले.

या कार्यक्रमासाठी श्री. गणेश कळसकर आणि श्री. हेमंत राजहंस यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. विद्यार्थ्यांचा समन्वय व कार्यक्रमाचे आयोजन अजिंक्य इंगळे यांनी अत्यंत नेटकेपणाने पार पाडले. कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांचे विशेष सहकार्य लाभले.





## मशीन लर्निंग, जनरेटिव्ह एआय विषयावर विशेष सत्र

समितीच्या डॉ. आपटे वसतिगृहाच्या मोडक सभागृहात २७ एप्रिल रोजी मशीन लर्निंग (Machine Learning) आणि जनरेटिव्ह एआय (Generative AI) या विषयावर विशेष सत्र आयोजित करण्यात आले होते.

या कार्यशाळेत डॉ. भूषण गरवारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. गरवारे हे गूगल क्लाउड इंडिया (पुणे) या कंपनीत एआय सल्लागार (AI Consultant) आहेत. त्यांनी सुवर्ण पदकासह पीएच.डी. संपादन केली असून आंतरराष्ट्रीय तीन पेटंटचे ते मानकरी आहेत.

Deep Learning, Explainable AI आणि Assistive Intelligence या क्षेत्रातील त्यांचा अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितला. सत्रामध्ये Supervised Learning, Unsupervised Learning, आणि Reinforcement Learning यांच्या मूलभूत संकल्पना संवादात्मक व प्रात्यक्षिक पद्धतीने त्यांनी समजावून सांगितल्या.

समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, डॉ. ज्योती गोगटे, गर्जे मराठी आणि क्रिएटिव्ह कोडरच्या मीनल रेणावीकर यांनी हे सत्र आयोजित करण्यास सहकार्य केले.

डॉ. गरवारे यांनी पुढील वर्षभरासाठी तीन योजना जाहीर केल्या. त्यामध्ये जुलैत दोन दिवसीय हँड्स- ऑन मशीन लर्निंग कार्यशाळा, Deep Learning व Advanced AI विषयांवरील संरचित स्वअभ्यास आणि फॉलोअप सत्रे, AI च्या विद्यार्थ्यांसाठी रिझ्युमे बिल्डिंग आणि मुलाखतीच्या तयारीसाठी विशेष मार्गदर्शन यांचा समावेश आहे.

## संस्कारवाणीतर्फे सॅनिटरी पॅड डिस्पोजल यंत्र

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या मुलींच्या नवीन वसतिगृहासाठी संस्कारवाणी फाउंडेशनच्या वतीने दोन सॅनिटरी पॅड डिस्पोजल यंत्रे देणगी स्वरूपात भेट देण्यात आली आहेत. या निमित्ताने फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विवेक शिरोडे, उपाध्यक्ष प्रवीण कोतकर, खजिनदार राजेंद्र तातर, विश्वस्त दिलीप येवले, नितीन दहिवलेकर, उमेश कोठावदे, सुनील शिनकर यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी समितीच्या वसतिगृहास भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला.



यावेळी कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, मुख्य विकास अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, कार्यकर्ते दिनकर वैद्य आदी उपस्थित होते. वसतिगृहाच्या पर्यवेक्षिका नम्रता गजरे यांनी आभार मानले.



*समितीच्या कार्यकर्त्या भावना महाजन यांनी आपली आई श्रीमती पुष्पा दिनकर खर्चे यांच्या वतीने वडील कै. दिनकर खर्चे यांच्या स्मृतिदिनानिमित्त २५ फेब्रुवारी २०२५ रोजी मुलींच्या नवीन वसतिगृहातील विद्यार्थिनींकरता सायकल खरेदीसाठी २५ हजार रुपयांची देणगी दिली. त्यातून विद्यार्थिनींना महाविद्यालयात जाण्यासाठी एकूण ६ सायकली उपलब्ध झाल्या आहेत. भावना महाजन या नवीन वसतिगृहाच्या पालक कार्यकर्ता म्हणून कार्यरत आहेत.*